**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०७**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : ०२ /०२/२०१८

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र - ७ मंगळवार दि. ६ /०२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती. सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका

**मंगळवार दिनांक ६ /२/२०१८ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ६७ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये पाणीपट्टीचे दरात वाढ करणेस मा.स्थायी समितीच्या मंजूरीने मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६८ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदावंर रेखा अमोलिक व इतर यांना अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्तीकरीता ए.एम.एम. व जी.एन.एम. या दोन्ही संवर्गाना दरमहा मानधन वाढविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ६९ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहाकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे व्हीजीट बेसवर पॅनल शिपवर नेमणूक करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७० | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ७१ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक पदी मानधनावर केलेल्या पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ७२ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांना मानधनावर करारबध्द पुर्नयुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ७३ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये पॅनल शिपवरील भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन वाढी बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७४ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ. स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ७५ | अहमदनगर महानगरपालिका सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मूल्यांचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- ६७ ते ७५ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०७

विषय क्रमांक- ६७ मंगळवार दि.०६/०२/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये पाणीपट्टीचे दरात वाढ करणेस मा.स्थायी समितीच्या मंजूरीने मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

संदर्भ- मा.स्थायी समिती सभा क्र.८ विषय क्र.१२० दिनांक १६/२/१७ अन्वये पारीत ठराव

विषयांकीत बाबत विनंती रिपोर्ट सादर की,पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होण्याचा दृष्ओकोनातुन पाणीपट्टी दरवाढ आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकीय मा.महासभेसमोर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावापैकी व्यवसायीक वापर व औदयोगिक वापरच्या पाणीपट्टीमध्ये प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार वाढ करण्यात यावी असा ठराव पारीत झालेला होता.

त्यानुसार घरगुती वापर पाणीपट्टी दरवाढ वगळता व्यावसायीक वापर,औदयोगिक वापर,इत्यादींचे पाणी दरामध्ये एप्रिल २०१६ पासून दरवाढ लागू करण्यात आलेली आहे.

परंतु अहमदनगर महानगरपालिकेकडे घरगुती वापर पाणी ग्राहकांची संख्याच मोठया प्रमाणावर असल्याने घरगुती पाणी ग्राहक वगळून इतर पाणी ग्राहकांचे पाणीपट्टीमध्ये दरवाढ केल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नामधून जास्त फरक पडत नाही.त्यासाठी घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे विषयी निर्णय घेणे आवश्यक असल्याने सन २०१७-१८पासून घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपट्टी दरवाढ करणे अत्यंत गरजेचे असले बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यते साठी सादर करण्यात आला असता या अनुषंगाने संदर्भीय ठराव पारीत झालेला आहे.

ठराव - "अहमदनगर महानगरपालिका सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने पाणीपट्टीचे दरात वाढ करणे बाबत सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार प्रस्तावास अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे सादर,नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."

सदरचा पारीत झालेला ठराव या विभागास दिनांक ६/३/२०१७ रोजी प्राप्त झालेनंतर मा.महासभेच्या मंजूरी करीता सदरचा प्रस्ताव नगर सचिव कार्यालयाकडे दिनांक ६/३/१७ रोजीच पाठविला असता सदरच्या प्रस्ताव दिनांक २० फेब्रुवारी २०१७ पूर्वीच पाठविणे आवश्यक होते.व तयास विलंब झालेला असल्याने त्यांचेकडून स्विकारण्यास असमर्थता दर्शविलेली होती.त्यामुळे सन २०१७-१८च्या बजेट महासभेमधील चर्चा व निर्णय होवू शकलेला नाही.

सदयस्थितीत महानगरपालिकेची अर्थिक परिस्थिती विचारात घेता चालू वर्षी पाणीपट्टीसह इतर करांचे अपेक्षित वसुली होत नसल्याचे महानगरपलिकेची शाश्वत उत्पन्न कमी होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे.परिणामी शहर पाणी योजनेपाटी वीज वितरण कंपनीचे दर महिन्याची वीज बीले वेळेत अदा होत नसल्याने वीज वितरण कंपनी कडून थकबाकीमुळे दोन वेळेस शहर पाणी योजनेचा वीज पुरवठा खंडीत केलेला आहे.व भविष्यातही वीज बीले वेळेत न भरली गेल्यास भविष्यात वीज कपातीचे संकट कायम आहे.

मागील ४ वर्षात पाणीपट्टी पासून मिळणारे उत्पन्न व खर्चाची आकडेवारी खालील प्रमाणे.

| वर्ष | उत्पन्न | खर्च | तोटा |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | ८३३.४४ | २०७८.५९ | १२४५.१५ |
| २०१४-१५ | १००४.०० | २०१९.६७ | १०१५.६७ |
| २०१५-१६ | १०४८.०० | २२२५.८६ | ११७७.८६ |
| २०१६-१७ | १०४५.३९ | २०४१.०३ | ९९५.६४ |

सन २०१६-१७ पासून व्यावसायीक वापर व औदयोगीक वापर पाणीपट्टी मध्ये दरवाढ लागू केलेली असतांनाही महानगरपालिकेस रूपये ९९५.६४ लक्ष इतका तोटा होत आहे.

त्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेकडे घरगुती पाणी वापर ग्राहकांची असलेली संख्या त्यामधून सदयस्थितीत मिळणारे उत्पन्न व प्रस्तावीत दर वाढ केल्यास त्यामधून मिळणारे उत्पन्न इत्यादी बाबींचे अवलोकन केले असता उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणात फरक पडणार आहे.तसे केले तरच पाणीपुरवठा योजना चालविलेणेसाठी लागणारा खर्च व त्यामधून मिळणारे उत्पन्न इत्यादींचा भविष्यात ताळमेळ बसविणे सुलभ होईल.त्याचा तपशील खलील प्रमाणे.

| वापर | मिळणारे उत्पन्न रूपये | प्रस्तावित उत्पन्न रूपये |
|---|---|---|
| घरगुती वापर नळ कनेक्शन | ७९४७६००० | १५,८९,४४,००० |
| व्यावसायिक नळ कनेक्शन | १२३९०००० | १२३९०००० |
| औद्योगिक वापर नळ कनेक्शन | ४००००० | ४००००० |
| हद्दीबाहेरील नळ कनेक्शन | ८७०००० | १७४०००० |
| मीटर वापर नळ कनेक्शन | २४४००००० | २७४००००० |
| पंचायत समिती/शासकीय टॅंकर व्दारे | ११५५२०० | ११५५२०० |
| पाणी विक्री जमा टॅंकर व्दारे पाणी विक्री | १२००००० | १२००००० |
| एकुण | ११,९८,९१,२०० | २०,३२,२९,२०० |

यास्तव सन २०१८-१९ पासून घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपट्टीमध्ये दरवाढ लागू करणे करीता विषयांकीत बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशीने मा.महासभेसमोर चर्चेसाठी ठेवून तेथील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहील.

**सोबत** - एकुण नळ कनेक्शन संख्य, त्यामधून मिळणारे उत्पन्न,घरगुती नळ कनेक्शन मध्ये दरवाढ लागू केल्यानंतर मिळणारे उत्पन्न व फरक इत्यादी बाबतचा सविस्तर तक्ता.

येणे प्रमाणे शाखा अभियांचा प्रभाग समिती क्र १ ते ४ यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,अहवाला प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे महासभेसमोर चर्चा अंती निर्णय घेणे उचित राहील.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांची स्वाक्षरी

यावर मा. अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार P-२५ नमूद केलेल्या तक्तप्रमाणे मान्यतेस्तव मा. महासभेकडे प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मागील पानावरील "अ" मान्यतेस्तव मा.स्थायी समिती व मा. महासभेकडे पाठवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये पाणीपट्टीचे दरात वाढ करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेने या पुर्वी केव्हा वाढ केली आहे?

शाखा अभियंता श्री. काकडे :- सन २००३ मध्ये वाढ केली आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- सन २००३ मध्ये किती वाढ झाली.

शाखा अभियंता श्री. काकडे :- नगरपरिषद असतानाचे दर रू. ८०६/- होती सन २००३ मध्ये त्यामध्ये वाढ होवून रूपये १५००/- केली आहे. तसेच हद्दीबाहेरील नळ कनेक्शन करिता रक्कम रूपये ३०००/- आकारण्यात येते.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- महानगरपालिकेचे सन २००३ पासून २०१८ या कालावधीतील सुमारे १५ वर्षामध्ये एकदाही वाढ झाली नाही का ?

शाखा अभियंता श्री. काकडे :- मुळा डॉम ते विळद पंपींग स्टेशन ते वसंत टेकडी पर्यतचे अंदाजे अंतर ३५ कि.मी. चे असुन ३ ठिकाणी पाण्याचा उपसा (पंपींग) करावा लागतो. त्यामुळे इतक्या दुरच्या अंतरावरून पाणी आणणे याकरिता लागणारा खर्च व पाणीपटटीद्वारे मिळणारे उत्पन्न यामध्ये तफावत आहे. ना नफा ना तोटा या तत्वावर पाणी पुरवठा करावयाचा असल्याने होणारा तोटा भरून काढण्याकरिता प्रशासनाने मागील ३ ते ४ वर्षापासून पाणीपटटी वाढीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर केला होता.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- प्रशासनाने किती वाढ सुचविली आहे.

शाखा अभियंता श्री. काकडे :- पाणीपटटीमध्ये दुप्पट वाढ म्हणजेच सध्या असणारी पाणीपटटी रूपये १५००/- व त्यामध्ये रूपये १५००/- वाढ करून रूपये ३०००/- करणेबाबतचा व हद्दीबाहेरील नळ कनेक्शन करिता रक्कम रूपये ३०००/- दुप्पट म्हणजेच रूपये ६०००/- तसेच मीटर वापर नळ कनेक्शन मध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- दरवाढ करायला काही हरकत नाही तुम्ही आधी पाणी दया. मनपा हद्दीमध्ये दिवसाआड पाणी येते, महिला भगिनीना रात्री, अपरात्री पाणी भरावे लागते, गढुळ पाणी येते यात प्रथम सुधारणा करा. नंतर दरवाढ करा. मा.शासनाने रूपये १२५ कोटी दिले कुठे सुधारणा झाली.

शाखा अभियंता श्री. काकडे :- केडगाव मध्ये ब-यापैकी सुधारणा झाली.

मा.सभापती साहेब :- सुधारणा झाली म्हणता मग टँकर का जातो.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- आधी सुधारणा केली पाहिजे नंतर दरवाढ करा आपली यंत्रणा चांगला नाही फेज-२ चे काम चालू आहे का ?

शाखा अभियंता श्री. काकडे :- पाईप आले आता काम चालू आहे.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- निकम साहेब आपण राहत असलेल्या ठिक्ाण शेजारील आदर्श कॉलनी मध्ये पाणी येत नाही. शहरातील अशा ब-याच भागात पाण्याची समस्या आहे. त्यामुळे प्रथम पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करा व नंतर पाणीपटटी मध्ये वाढ करावी.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- आदर्श कॉलनीमध्ये चोकअप आहे म्हणून पाणी नाही हया प्रस्तावाच्या अनुषंगाने थोडी वस्तुतिथी सांगतो. आपले शहर हे उंचावर आहे. धरण खाली आहे. आपल्याला पंपीग करून पाणी आणाव लागत पाणी पुरवठा योजना ही ना नफा ना तोटा या तत्वावर ही योजना चालली गेली पाहिजे.

शाखा अभियंता श्री. काकडे :- पाणी योजनेवरील महावितरणची सततची कारवाई , योजनेत होणारा तोटा, शासनाने निर्देश याबाबींचा विचार करता वाढ होणे गरजेचे आहे.

मा. सभापती साहेब :- मुळा डॅम ते विळद पंपींग स्टेशन ते वसंत टेकडी येथून शहरास पाणी पुरवठा करण्या करीता रोजचा खर्च किती येतो ?

शाखा अभियंता श्री. काकडे :- महानगरपालिकेला पाणी योजनेसाठी दरमहा २ कोटी म्हणजे वर्षाकाठी रूपये २४ कोटीचा खर्च करावा लागतो.

मा. सभापती साहेब :- पाणी पुरवठ्या करीता येणारा खर्च व पाणीपट्टी अंतर्गत होणारी वसूली या मध्ये किती तफावत येते ?

शाखा अभियंता श्री. काकडे :- महानगरपालिकेची घरगुती नळधारकांकडून सध्या प्रतिवर्षी रूपये १५००/- पाणीपटटी आकारते. महानगरपालिकेकडे सुमारे ५३ हजार नळधारकांची नोंद आहे.यातून रूपये ११ कोटीचे उत्पन्न महानगरपालिकेला मिळते.मात्र महापालिकेला पाणी योजनेसाठी दरमहा रू.२ कोटी म्हणजे वर्षाकाठी रूपये २४ कोटीचा खर्च करावा लागतो पाणीपटटी पोटी असलेली मागणी व खर्च यात दरवर्षी रूपये १३कोटी तोटा महानगरपालिकेला सहन करावा लागतो.

मा.श्री.दत्तात्रय कावरे:- प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावामध्ये पाणीपटटी रूपये १५००/-वाढ सुचविली असुन ती आवास्तव वाटते ती कमी करून रूपये १२००/- वाढ करण्यात यावी.

मॅके. इंजि. श्री. निकम :- सभेची परवानगी घेवुन मी याबाबतची माहिती सांगतो.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- निकम साहेब माहिती सांगा.

मॅके. इंजि. श्री. निकम :- पाणीपटटी पोटी असलेली मागणी व खर्च यात दरवर्षी १३ कोटीचा तोटा महापालिकेला सहन करावा लागतो महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती अडचणीची असल्याने व मुळात पाणीपटटीची मागणीच खर्चापेक्षा कमी असल्याने वीज बिले वेळेवर भरणेही महानगरपालिकेला शक्य होत नाही त्यामुळे महावितरणाच्या कारवाईची नामुष्की महापालिकेवर ओढावते राज्य शासनाने योजनांना निधी वितरीत करतांनाच पाणी योजना ना नफा ना तोटा तत्वावर चालवाव्यात असे स्पष्ट आदेश दिले आहेत. त्यामुळे पाणी योजनेच्या खर्चातील तूट भरून काढणेही आवश्यक असून पाणीपटटीत रूपये १५००/- वाढ तसेच हद्दीबाहेरील नळ कनेक्शन करिता रक्कम रूपये ३०००/- दुप्पट म्हणजेच रूपये ६०००/- तसेच मीटर वापर नळ कनेक्शन मध्ये वाढ करावी.

मा.श्री. समद खान :- घरगुती वापर नळ कनेक्शनकरिता रूपये १०००/- वाढ करण्यात यावी. तसेच हद्दीबाहेरील नळ कनेक्शन करिता रक्कम रूपये २०००/- वाढ करण्यात यावी. तसेच मीटर वापर नळ कनेक्शन मध्ये कोणतीही वाढ करू नये.

मा.श्रीमती उषा नलवडे :- प्रस्तावामध्ये पाणीपटटी रूपये १५००/-वाढ सुचविली असुन ती आवास्तव वाटते ती कमी करून रूपये १०००/- वाढ करण्यात यावी. तसेच हद्दीबाहेरील नळ कनेक्शन करिता रक्कम रूपये २०००/- वाढ करण्यात यावी. तसेच मीटर वापर नळ कनेक्शन मध्ये कोणतीही वाढ करू नये. शहरातील मालमत्ताधारक व नळजोडणी यात मोठी तफावत आहे. त्यामुळे यापुढे बोगस नळकनेक्शनची शोधमोहीम आणखी तीव्र करण्यात यावी. त्यात यापुढे बोगस नळकनेक्शन धारकांकडून दुप्पट दंड आकारावा.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- घरगुती वापर नळ कनेक्शनकरिता रूपये १०००/- वाढ करण्यात यावी. तसेच हद्दीबाहेरील नळ कनेक्शन करिता रक्कम रूपये २०००/- वाढ करण्यात यावी. तसेच मीटर वापर नळ कनेक्शन मध्ये कोणतीही वाढ करू नये. शहरातील मालमत्ताधारक व नळजोडणी यात मोठी तफावत आहे. त्यामुळे यापुढे बोगस नळकनेक्शनची शोधमोहीम आणखी तीव्र करण्यात यावी. त्यात यापुढे बोगस नळकनेक्शन धारकांकडून दुप्पट दंड आकारावा. प्रस्ताव अखेर मंजूरीसाठी मा. महासभेकडेस सादर करण्यात यावा.

मा. सभापती साहेब :- महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती अडचणीची असल्याने व मुळात पाणीपटटीची मागणीच खर्चापेक्षा कमी असल्याने वीज बिले वेळेवर भरणेही महानगरपालिकेला शक्य होत नाही त्यामुळे महावितरणाच्या कारवाईची नामुष्की महापालिकेवर ओढावते. अहमदनगर शहरालगत असणा-या स्थानिक स्वराज्य संस्थाचे (ग्रामपंचायत, नगरपालिका , महानगरपालिका ) यांचे दर हे आपल्यापेक्षा जास्त आहेत. काही प्रमाणात वाढ केल्यास महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाची तूट लगेच भरून येणार नाही. परंतू त्यातील काहीसा ताण कमी होईल. मा.राज्य शासनाने योजनांना निधी वितरीत करतांनाच पाणी योजना ना नफा ना तोटा तत्वावर चालवाव्यात असे स्पष्ट आदेश दिले आहेत. पाणी पुरवठा योजना स्वंयपुर्ण होण्याच्या दृष्टीने व महानगरपालिकेची शाश्वत उत्पन्न कमी होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत असल्याने याचा विचार करता घरगुती वापर नळ कनेक्शनकरिता रूपये १०००/- वाढ करण्यात यावी. तसेच हद्दीबाहेरील नळ कनेक्शन करिता रक्कम रूपये २०००/- वाढ करण्यात यावी. तसेच मीटर वापर नळ कनेक्शन मध्ये कोणतीही वाढ करू नये. शहरातील मालमत्ताधारक व नळजोडणी यात मोठी तफावत आहे. त्यामुळे यापुढे बोगस नळकनेक्शनची शोधमोहीम आणखी तीव्र करण्यात यावी. त्यात यापुढे बोगस नळकनेक्शन धारकांकडून दुप्पट दंड आकारावा. प्रस्ताव अखेर मंजूरीसाठी मा. महासभेकडेस सादर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये पाणीपट्टीचे दरात वाढ करणेबाबत सभेत झालेल्या साधक-बाधक चर्चेनुसार महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती अडचणीची असल्याने व मुळात पाणीपटटीची मागणीच खर्चापेक्षा कमी असल्याने वीज बिले वेळेवर भरणेही महानगरपालिकेला शक्य होत नाही त्यामुळे महावितरणाच्या कारवाईची नामुष्की महापालिकेवर ओढावते. अहमदनगर शहरालगत असणा-या स्थानिक स्वराज्य संस्थाचे (ग्रामपंचायत, नगरपालिका , महानगरपालिका ) यांचे दर हे आपल्यापेक्षा जास्त आहेत. काही प्रमाणात वाढ केल्यास महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाची तूट लगेच भरून येणार नाही. परंतू त्यातील काहीसा ताण कमी होईल. मा.राज्य शासनाने योजनांना निधी वितरीत करतांनाच पाणी योजना ना नफा ना तोटा तत्वावर चालवाव्यात असे स्पष्ट आदेश दिले आहेत. पाणी पुरवठा योजना स्वंयपुर्ण होण्याच्या दृष्टीने व महानगरपालिकेची शाश्वत उत्पन्न कमी होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत असल्याने घरगुती वापर नळ कनेक्शनकरिता रूपये १०००/- वाढ करण्यात यावी. तसेच हद्दीबाहेरील नळ कनेक्शन करिता रक्कम रूपये २०००/- वाढ करण्यात यावी. तसेच मीटर वापर नळ कनेक्शन मध्ये कोणतीही वाढ करू नये. शहरातील मालमत्ताधारक व नळजोडणी यात मोठी तफावत आहे. त्यामुळे यापुढे बोगस नळकनेक्शनची शोधमोहीम आणखी तीव्र करण्यात यावी. त्यात यापुढे बोगस नळकनेक्शन धारकांकडून दुप्पट दंड आकारण्याची शिफारस करण्यांत येत आहे. प्रस्तावास अखेर मंजूरी साठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक :-मा.श्रीमती उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०७

विषय क्रमांक- ६८ मंगळवार दि.०६/०२/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदावंर रेखा अमोलिक व इतर यांना अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्तीकरीता ए.एम.एम. व जी.एन.एम. या दोन्ही संवर्गाना दरमहा मानधन वाढविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ:-१)रेखा अमोलिक व इतर यांचा दिनांक ०४/१०/२०१७ रोजीचा अर्ज.

२)मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांचेकडील जा.क्र.६७९ दि.२७/१०/२०१७ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये की, रेखा अमोलिक व इतर यांनी दि. २७/१०/२०१७ रोजी विनंती अर्ज देवुन दरमहा मानधनामध्ये रु. ५,०००/- वाढ करणे बाबत विनंती केलेली आहे. सदर अर्जच्या अनुषंगाने इकडील जा.क्र. २६६० दि. २५/१०/२०१७ अन्वये मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांना पत्र देवुन मानधनवाढ विषयी संदर्भात स्वयंस्पष्ट अहवाल सादर करणे बाबत सुचित केलेले होते.

त्यानुषंगाने अनुषंगाने मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा. क्र. ६७९ दिनांक २७/१०/२०१७ अन्वयेच्या अहवालपत्रामध्ये " रेखा अमोलिक व इतर यांनी दि. ०४/१०/२०१७ रोजीचा अर्ज देवुन मानधन वाढीबाबत विनंती केलेली आहे. कै. बा.दे.दवाखान्याकरीता सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी करार नेमणुकीवरील ए.एन.एम. पात्रता असलेल्या परिचारीकांना दरमहा रु.६,०००/- व जी.एन.एम. पात्रता असलेल्या परिचारीकांना दरमहा रु. ८,०००/- मानधन अदा करण्यात येत आहे. वास्तविक सध्या रक्तपेढी विभागामधील (आस्थापना विभागामार्फत नियुक्ती) जी.एन.एम. पात्रता असलेल्या परिचारीकांना दरमहा रु.११,०००/- व आरोग्य विभागामधील एन.यु.एच.एम. विभागामार्फत नियुक्ती करण्यात आलेल्या ए.एन.एम. पात्रता असलेल्या परिचारीकांना रु. ८,०००/- दरमहा मानधन देण्यात येत आहे. तरी अर्ज केलेल्या परिचारीकांच्या कामाचा अनुभव वरील प्रमाणे इतर विभागातील परिचारीकांच्या दरमहा मानधनाचा विचार करता ए.एम.एम. पात्रता असलेल्या परिचारीकांना दरमहा रु. ८,०००/- व जी.एन.एम. पात्रता असलेल्या परिचारीकांना रु. ११,०००/- मानधन देणेस शिफारस आहे. " असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

यापुर्वी मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांचे वेळोवेळी अहवालाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदांसाठी अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर सहा महिन्या करीता करारबध्द नियुक्तीसाठी थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या मा. निवड समिती मार्फत मुलाखती घेवुन उमेदवारांची निवड करुन भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली असुन त्यामध्ये ए.एम.एम. शैक्षणिक पात्रताधारकास रु.६,०००/- व जी.एन.एम. शैक्षणिक पात्रताधारकास रु.८,०००/- इतके मानधन दर्शविण्यात आलेले होते.

सद्यस्थितीमध्ये मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांचे प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन वेळोवेळी सहा - सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदांवर संबधितांची ए.एम.एम. शैक्षणिक पात्रताधारकास रु. ६,०००/- व जी.एन.एम. शैक्षणिक पात्रताधारकास रु.८,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्त्यांबाबत कार्यवाही करण्यात येत आहेत.

वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा. क्र. ६७९ दिनांक २७/१०/२०१७ अन्वयेच्या अहवालपत्रामध्ये नमुद केल्या नुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरुपात

परिचारीका यापदांवर संबधितांची ए.एम.एम. शैक्षणिक पात्रताधारक असल्यास रु. ८,०००/- व जी.एन.एम. शैक्षणिक पात्रताधारक असल्यास रु.११,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्त्या बाबत कार्यवाही करणेस झाल्यास सदरचा मानधनवाढी बाबतचा विषय आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने प्रसुत प्रकरणी मा. स्थायी समितीची पुर्व मान्यता घेणे उचित होईल. त्यानुषंगाने दरमहा मानधनवाढी बाबतचा तपशिल खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अं. नं. | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | विभाग | शैक्षणिक पात्रता | सध्याचे दरमहा मानधन रक्कम रु. | प्रस्तावित दरमहा मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | परिचारीका | कै.बा.दे.दवा. | ए.एम.एम. | ६,०००/- | ८,०००/- |
| | | | जी.एन.एम. | ८,०००/- | ११,०००/- |

तरी उपरोक्त वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा.क्र.६७९ दि.२७/१०/२०१७ अन्वयेच्या अहवालपत्रामध्ये नमुद केल्या नुसार त्यानुषंगाने कै. बा.दे.दवा.अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदांचे वरील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे दरमहा मानधन वाढ निश्चित करणे बाबतचा प्रस्ताव निर्णयासाठी मा. स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणे बाबत प्रस्तुत प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे प्र. सहाय्यक आयुक्त यांचा रिपोर्ट असे.

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मु.ले.अ. , मु.ले.प. मार्फत सादर करावे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, सदरील बाब धोरणात्मक असल्याने स्थायी समितीच्या निर्णयार्थ सादर. , मनपा अधि. सुधारित २०११ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे उचित होईल मा.उपायुक्त यांचे स्वंयस्पष्ट अभिप्राय घेवुन मुलेप यांच स्वाक्षरीसाठी सादर करण्याची यापुढे दक्षता घ्यावी तसेच आस्थापना प्रमुख यांचे अभिप्राय घेणे योग्य राहील.

यावर मा.उपायुक्त (सा) साहेब यांचा स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, ए.एम.एम. व जी.एन.एम. या दोन्ही संवर्गाना दरमहा रूपये २०००/- वाढ करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठवा.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- कै. बा.दे. दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदावंर रेखा अमोलिक व इतर यांना अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्तीकरीता ए.एम.एम. व जी.एन.एम. या दोन्ही संवर्गाना दरमहा मानधन वाढविणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- या परिचारीकांचे काम व्यवस्थीत आहे का?

आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :- ६ सिस्टर मानधनावर कार्यरत आहे. १२५ डिलीव्हरी महिन्याला होतात. परमनंट ९ सिस्टर आहे. या ६ सिस्टर गेले ४ ते ५ वर्ष झाले त्या काम पहातात. त्यांनी मानधन वाढ होणे बाबत मागणी केली आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- सध्या किती मानधन आहे व किती रूपये मानधना मध्ये वाढ मागीतली आहे?

आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :- ए.एम.एम. शैक्षणिक पात्रताधारक असल्यास रु. ६,०००/- व जी.एन.एम. शैक्षणिक पात्रताधारक असल्यास रु.८,०००/- सध्या मानधन आहे.त्यांनी मानधनामध्ये रु. ५,०००/- वाढ करणे बाबत विनंती केलेली आहे.मा.आयुक्तांनी रूपये २०००/- वाढ सुचिवली आहे.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये शुभम तुकाराम पंगुडवाले, प्रविण अर्जुन बेद्रे व गणेश पिस्का यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील क्रिडा संकुल मधील वॉचमन रूमच्या मागे अनुक्रमे १५x २०चौरस फुट जागा व्यावसाया करीता भाडेतत्वावर मिळणे बाबत अर्ज देवून मागणी केली आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ए.एम.एम.व जी.एन.एम. यांना सध्या असलेल्या मानधनामध्ये रूपये २०००/- वाढ करण्यात यावी.शुभम तुकाराम पंगुडवाले, प्रविण अर्जुन बेद्रे व गणेश पिस्का यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील क्रिडा संकुल मधील वॉचमन रूमच्या मागे अनुक्रमे १५x२०चौरस फुट जागा व्यावसाया करीता भाडेतत्वावर देण्यात यावी.

मा.श्री. संजय शेंडगे :- ए.एम.एम. व जी.एन.एम. या दोन्ही संवर्गाना दरमहा रूपये २०००/- वाढ करण्यात यावी. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीचा विचार करता प्राप्त अर्जानुसार शुभम तुकाराम पंगुडवाले, प्रविण अर्जुन बेद्रे व गणेश पिस्का यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील क्रिडा संकुल मधील वॉचमन रूमच्या मागे अनुक्रमे १५x २०चौरस फुट जागा व्यावसाया करीता भाडेतत्वावर देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदावंर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्तीकरीता ए.एम.एम. व जी.एन.एम. या दोन्ही संवर्गाना दरमहा रक्कम रूपये २०००/-मानधन वाढविण्यात येत आहे.सभेमध्ये प्राप्त अर्ज व झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीचा विचार करता प्राप्त अर्जानुसार शुभम तुकाराम पंगुडवाले, प्रविण अर्जुन बेद्रे व गणेश पिस्का यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील क्रिडा संकुल मधील वॉचमन रूमच्या मागे अनुक्रमे १५x २०चौरस फुट जागा व्यावसाया करीता भाडेतत्वावर देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदावंर रेखा अमोलिक व इतर यांना अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्तीकरीता ए.एम.एम. व जी.एन.एम. या दोन्ही संवर्गाना दरमहा रक्कम रूपये २०००/- मानधनामध्ये वाढ करण्यात येत आहे.खर्च मंजूर. सभेमध्ये प्राप्त अर्ज व झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीचा विचार करता शुभम तुकाराम पंगुडवाले, प्रविण अर्जुन बेद्रे व गणेश पिस्का यांना अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील क्रिडा संकुल मधील वॉचमन रूमच्या मागे अनुक्रमे १५x २०चौरस फुट जागा व्यावसायासाठी ११ वर्ष करीता कराराने अटी व शर्ती नुसार भाडे तत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे. या बाबत कार्यालयीन सोपस्कार संबंधीत विभागाने तात्काळ पुर्ण करावेत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. दत्तात्रय कावरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. संजय शेंडगे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ६९ मंगळवार दि.०६/०२/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहाकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे व्हीजीट बेसवर पॅनल शिपवर नेमणूक करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह विभाग

संदर्भ :- १. स्थायी समिती ठराव क्र. १२६ दिनांक ३१/८/२०१३ अन्वये पारित ठराव

२. जा.क्र. आस्थापना ५०७५ दि.२२/१०/२०१३ ने नेमणूक आदेश

उपरोक्त विषयानुसार विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, कै.बा.दे. दवाखाना व प्रसुतीगृह हे १०० खाटांचे रूग्णालय असुन २४ तास अविरत कार्यरत आहे. येथे दररोज साधारण ८० ते १०० रूग्ण बाह्यरूग्ण विभागामध्ये तपासणी करिता येत असतात तसेच दररोज साधारण १५ ते २० प्रसुती, आवश्यकतेनुसार दरमहा साधारण १५० इमर्जन्सीच्या सिझेरियन शस्त्रक्रिया व दररोज ५ ते ६ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्या जातात.

कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे दररोज होणा-या सिझेरीयन शस्त्रक्रिया व कुंटुब नियोजन शस्त्रक्रियेकरिता स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची आवश्यकता भासते. दवाखान्यामध्ये स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची संख्या अपुरी असल्याने मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १२६ दिनांक ३१/८/२०१३ ने जा.क्र.आस्थापना ५०७५ दिनांक २२/१०/२०१३ अन्वये दि.०९/०५/२०१३ ते ०८/०५/२०१६अखेर तीन वर्षाकरिता स्त्रीरोगतज्ञांची पॅनलशिपवर मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असुन सदरची मुदत दि.०८/०५/२०१६ रोजी संपलेली आहे. सध्या स्त्रीरोगतज्ञांना प्रत्येक भेटीस (व्हीजीट)फी रू.२००/-व प्रत्येक शस्त्रक्रियेस (सर्जन फी) रू.१०००/- या प्रमाणे मानधन अदा करण्यात येते होते.तद्नंतर मानधन कमी असल्यामुळे सदर नेमणूक संपल्यानंतर पुढील कालावधीकरिता पॅनलमध्ये काम करणेस स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांनी इच्छुक नसल्याचे कळविले.

कै.बा.दे.दवाखाना येथे पुर्ण वेळ स्त्रीरोग तज्ञ डॉ. शिल्पा पाठक, एन.यु.एच.एम. अंतर्गत १ अर्धवेळ वैदयकीय अधिकारी डॉ. गुंजाळ व २ आरएमओ हे बाळासाहेब देशपांडे दवाखान्याचे कामकाज पाहत आहे. परंतू डॉ. शिवराज गुंजाळ यांनी दि.०८/१२/२०१७ रोजी राजीनामा दिलेला आहे. तसेच कै.बा.दे. दवाखाना येथील कायम स्त्रीरोगतज्ञ डॉ. वृषाली पाटील गेल्या १ वर्षापासुन गैरहजर आहेत. तसेच एन.यु.एच.एम. अंतर्गत नियुक्त केलेले स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची मागणी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेकडे मागील महिन्यात करण्यात आली आहे. परंतू स्त्रीरोगतज्ञ डॉक्टर उपलब्ध झालेले नाहीत.त्यामुळे सध्या कै.बा.दे. दवाखाना येथे प्रसुती व शस्त्रक्रिया साठी एकच तज्ञ डॉक्टर डॉ. शिल्पा पाठक उपलब्ध आहेत. परंतु त्या एकटया २४ तासात वरील सेवा देवू शकणार नाहीत. डॉ. शिवराज गुंजाळ यांच्या राजीनाम्यामुळे प्रसुतीसाठी ज्या रूग्णाला सिझेरियन शस्त्रक्रिया व इतर अन्य शस्त्रक्रिया लागतील त्यासाठी दिवसा सकाळी ८ ते संध्याकाळी ६ या वेळेमध्ये सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे. दवाखान्याची प्रसुती संदर्भात सेवा २४ तास अविरत चालू रहाणेकामी ३ स्त्रीरोगतज्ञ २४ तास उपलब्ध राहणे अत्यंत आवश्यक आहे.

शहरातील इच्छुक स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांच्या संघटनेशी पॅनल बाबतीत चर्चा केली असता दवाखान्याच्या आवश्यकतेनुसार कॉल केल्यानंतर प्रत्येक भेटीस (व्हीजीट फी) रू.२००/- तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रियेस दिवसा (सर्जन फी) रू.२०००/- व नाईटला (१०.००pm to ६.०० am) रू. ३०००/- याप्रमाणे मानधनावर पॅनलमध्ये काम करणेची तयारी दर्शविली आहे व त्याप्रमाणे अर्ज या कार्यालयाकडे सादर केलेले आहे. सदरची नेमणूक ही कुठल्याही प्रकारची स्थायी अथवा अस्थायी नेमणूक नसुन दवाखान्यामध्ये सिझेरीयन शस्त्रक्रियेस आवश्यकता भासल्यास त्यांना कॉल करून शस्त्रक्रियेनुसार फी अदा केली जाईल. तसेच पॅनलची नेमणूक केल्यानंतर एखादा स्त्रीरोगतज्ञांनी पॅनलमध्ये नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज केल्यास त्याच्या अर्जाचा विचार करून प्रस्ताव ठेवुन प्रशासकीय मंजुरी घेउन पॅनलमध्ये त्यांना समाविष्ट करण्यात येईल. तसेच कै.बा.दे.

दवाखाना येथे व्हीजीट बेसवर प्रती शस्त्रक्रियेकरिता भुल देणेसाठी भुलतज्ञ डॉक्टरांचे पॅनल कार्यरत आहे. त्याच धर्तीवर सध्या महापालिकेकडे १ कायमपदावरील स्त्रीरोगतज्ञ  असल्याने तसेच त्यांचे रजेच्या काळात आणि दिवसेंदिवस रूग्णांची संख्या वाढत असल्याने कायमस्वरूपी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे पॅनले शस्त्रक्रियेसाठी व्हीजीट बेसीसवर उपलब्ध असणे अत्यंत आवश्यकत आहे. सदरचे पॅनल नेमणे, त्यामध्ये नाव समाविष्ट करणे / वगळणे त्यांचे मानधन अदा करणे बाबत सर्व कार्यवाही आस्थापना विभागाशी संबंधीत न ठेवता कै.बा.दे.दवाखान्याच्या कार्यालयामार्फत होणे प्रशासकीय कामकाजासाठी सुलभ होउन तज्ञ डॉक्टरांची सेवा ही खंडीत विना विलंब घेता येईल तसेच सदरची नियुक्ती पॅनलशिपवर प्रति व्हीजीट / प्रति रूग्ण आहे कंत्राटी, आस्थायी किंवा एकत्रित मासिक मानधनवर नसल्याने आस्थापना विभागाकडे हे कामकाज देउ नये असे वाटते.

तरी दवाखान्याच्या रूग्णसेवेमध्ये स्त्रीरोगतज्ञ डॉक्टर्स अभावी गैरसोय होउ नये म्हणुन सोबतच्या यादीतील शहरातील इच्छुक अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची प्रत्येक भेटीस (व्हीजीट फी) रू.२००/-तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रियेस दिवसा(सर्जन फी) रू.२०००/-व नाईटला(१०.००pmto६.००am) रू.३०००/- याप्रमाणे मानधन निश्चित करून पॅनलशीपवर नेमणूक करणेकामी प्रस्ताव मा.स्थायीसमितीपुढे निर्णयास्तव व मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र. वैद्यकीय अधिक्ष यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, आर्थिक तरतुदीसह फेरसादर

यावर वैद्यकीय अधिकक्ष यांचा अभिप्राय की, मा. फेरसादर  मनपा मंजुर बजेट सन २०१७-१८ , अ.क्र.३५ लेखाशिर्ष - मानधन (वैद्यकीय अधिकारी, नर्स लॅब टेक्नी.), एकुण तरतुद- ८०,००,०००/-, झालेला खर्च- २०,२५,५४०/-, शिल्लक तरतुद- ५९,७४,४६०/-

वरील प्रमाणे तरतुद फरेशी आहे. प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, १] A सोबत यादी नाही , २] संबंधित डॉक्टरांचे संमनीपत्र आवश्यक पॅनलवर नेमणूक करावयाच्या डॉक्टरीं संख्या नमूद नाही त्वरीत समक्ष चर्चा करावी.

यावर वैद्यकीय अधिकक्ष यांचा अभिप्राय की, फेरसादर कै. बा.दे. दवाखाना येथे पॅनलेशीपवर ---- काम करणेस इच्छुक  यात स्त्रीरोगतज्ञ  यांची यादी व प्राप्त प्रशासकीय मंजुरीस्तव व वेळोवेळी गरजेनुसार व प्राप्त इच्छुकांच्या अर्जान्वये पॅनलेशीपमध्ये प्रशासकीय मंजुरीने स्थायी समितीच्या पॅनले नियुक्तीच्या ठरावानंतर --- नावे टाकता येतील तरी आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी

कै.बा.दे. दवाखाना व प्रसुती गृहाकरिता स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची पॅनलशीपवर नेमणूक करणेकामी शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची यादी

| अ.क्र. | स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | डॉ.सौ. शिल्पा टी गहाणे | M.B.B.S. D.G.O. |
| २ | डॉ.सौ. मिनाक्षी अमित करडे | M.B.B.S. D.G.O. |
| ३ | डॉ.श्री. अमित हरिश्चंद्र करडे | M.B.B.S. D.G.O. |
| ४ | डॉ. प्रतिमा डी. दातरंगे | M.B.B.S. D.G.O. |
| ५ | डॉ.श्री. अतुल विजयकुमार गुगळे | M.B.B.S. D.G.O. ,D.N.B. |
| ६ | डॉ.सौ. सुवर्णा होशिंग | M.B.B.S. D.G.O. , D.N.B. |
| ७ | डॉ.सौ. संगिता त्र्यंबके | M.B.B.S. D.G.O. |

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहाकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे व्हीजीट बेसवर पॅनल शिपवर नेमणूक करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

आरोग्यधिकारी श्री.डॉ. राजूरकर :- कै.बा.दे. दवाखान्यामध्ये आपल्याकडे १ डॉक्टर शिल्पा पाठक आहे डॉ. वृषाली पाटील यांच्यावर कार्यवाही चालू आहे.

वैद्यकीय अधिकारी श्री. डॉ. बोरगे :- १ महिन्यात त्यांची चौकशी पुर्ण करू.

आरोग्यधिकारी श्री.डॉ. राजूरकर :- भुलतज्ञ पॅनलप्रमाणे आपण डॉक्टरांचाही पॅनल नेमणूक ७ डॉक्टरांचे पॅनल आपण प्रस्तावीत केले आहे.या प्रस्तावा व्यातिरीक्त अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखाना येथे व्हीजीट बेसवर पॅनल शिपवर काम करणे करीता डॉ.सौ.निलोफर धानोरकर,डॉ.मंगेश बी राउत यांनी पॅनलशिपवर काम करणेस तयार असलेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे.त्यानुसार त्यांची नियुक्ती याच सभेमध्ये करण्यात यावी.

मा.श्री. संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केलेल्या ७ डॉक्टरांव्यतिरिक्त व्हीजीट बेसवर पॅनल शिपवर काम करणे करीता डॉ.सौ.निलोफर धानोरकर,डॉ.मंगेश बी राउत यांची पॅनलशिपवर नेमणूक करण्यात यावी.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. डॉ.सौ.निलोफर धानोरकर,डॉ.मंगेश बी राउत यांची पॅनलशिपवर नेमणूक करण्यात यावी.

मा.सभापती साहेब **:-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहाकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे व्हीजीट बेसवर पॅनल शिपवर नेमणूक करण्यास तसेच व्हीजीट बेसवर पॅनल शिपवर काम करणे करीता डॉ.सौ.निलोफर धानोरकर,डॉ.मंगेश बी राउत यांना पॅनलशिपवर नियुक्ती करण्यात यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहाकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे व्हीजीट बेसवर पॅनल शिपवर नेमणूक करण्यास तसेच व्हीजीट बेसवर काम करणे करीता डॉ.सौ.निलोफर धानोरकर,डॉ.मंगेश बी राउत यांना पॅनलशिपवर नियुक्ती करण्यास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. दत्तात्रय कावरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. संजय शेंडगे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ७० मंगळवार दि.०६/०२/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- पाणीपुरवठा विभाग प्रमुख शहर पाणी पुरवठा योजना यांचेकडील जा.क्र. ४६२ दिनांक २१/७/२०१७ अन्वयेचा अहवाल

उपरोक्त विषयान्वये प्रस्तावीत सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग प्रमुख शहर पाणी पुरवठा योजन यांची संदर्भिय प्रस्ताव सादर करून दिनांक ६/११/२०१५ रोजीचे संदर्भिय आदेशानुसार अहमदनगर महानगरपलिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक पदावर ६ महिन्याकरीता निर्देशीत अटी शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूकी करण्यात आलेल्या होत्या.

परंतु कंत्राटी करारानुसार नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.०९/०५/२०१६ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे मुदतवाढ मिळणेकामी खालील नमुद कर्मचारी यांची दि.२२/६/२०१७ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | हुददा |
|---|---|---|
| १ | श्री. संतोष छबु भालेराव | तांत्रिक सहाय्यक |
| २ | श्री. आशिष रमेश शेलार | तांत्रिक सहाय्यक |
| ३ | श्री. खान इम्रान अयुब | तांत्रिक सहाय्यक |

या अनुषंगाने मा.आयुक्तयांचे संदर्भिय पारित आदेशानुसार पाणीपुरवठा विभागाकरीता मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूप तांत्रिक सहाय्यक पदावरील नमुद कर्मचा-यांना नियमानुसार मान्यता घेवुन मुदतवाढ देणे संयुक्तीक वाटते असे नमुद केलेले आहे.

तथापि अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागामध्ये पदावर Out Sourcing ठेका पध्दतीने नियुक्ती बाबत कार्यवाही सद्यस्थिती मध्ये अंतिम करण्यात असल्याने संदर्भिय प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या संबंधिताना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे उचित वाटत नाही त्याप्रमाणे पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांना कळविणे मान्यतेस्तव सादर.

येणेप्रमाणे प्र. सहाय्यक आयुक्त यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुदत दि.९/५/२०१६ रोजी संपुष्टात आले आहे. त्यानंतर सदर कर्मचारी कार्यरत आहेत काय ?समक्ष चर्चा

--***--

फेरसादर,

संदर्भ - पाणीपुरवठा विभाग प्रमुख , शहर पाणी पुरवठा योजना यांचे कडील जा.क्र.४६२
दिनांक २१/७/२०१७ अन्वयेचा अहवाल

विनंती रिपोर्ट की,आस्था./ करारबध्द नेमणुक जा.क्र.५८८३दि.०६/११/२०१५अन्वये तांत्रिक सहाय्यक यांची नियुक्ती दिनांक ९/११/२०१५ते ८/५/२०१६पर्यत असून सदर नियुक्ती दिनांक ९/५/२०१६ रोजी संपुष्टात आलेले असुन पुर्ननियुक्ती बाबत पाणी पुरवठा विभागाकडून कुठल्याही प्रस्ताव इकडेस प्राप्त झालेले नाही. तसेच सदर मानधनावरील कर्मचारी दिनांक ९/५/२०१६पासून मनपा पाणी पुरवठा विभागाकडे कार्यरत नाहीत.

दिनांक ०६/११/२०१५ चे आदेशामध्ये ५ कर्मचा-यांना मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात पुर्ननियुक्ती देण्यात आली होती.त्यामधील ०३ कर्मचा-यांचे पाणी पुरवठा विभागाने पुर्ननियुक्ती प्रस्ताव सादर केला आहे. तसेच सदरहू कर्मचा-यांनी दिनांक २८/०३/२०१६ च्या पत्रान्वये अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेवर नियमीत वेतनश्रेणीवर घेण्याची मागणी केली आहे. तरी उपरोक्त बाबींचा विचारकरता दिनांक २१/८/२०१७ चे प्रस्तावास मान्यता असावी.

येणेप्रमाणे प्र. सहाय्यक आयुक्त यांचा फेरसादर असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, त्या कर्मचा-यांना कार्यमुक्त केल्यास त्यांचे काम कोण करणार ? व्यवस्था काय ? कृपया चर्चा

यावर मा. आयुक्त साहेब यांचा स्वाक्षरी की, मान्यतेसाठी मा. स्थायी समितीकडे पाठवावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- सदरचे कर्मचारी केव्हा पासुन कार्यरत नाहीत. या कर्मचा-यांची पुर्ननियुक्त अदयाप पर्यत का करण्यात आली नाही ?

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- पुर्ननियुक्ती बाबत पाणी पुरवठा विभागाकडून कुठल्याही प्रस्ताव इकडेस प्राप्त झालेले नाही. तसेच सदर मानधनावरील कर्मचारी दिनांक ९/५/२०१६पासून मनपा पाणी पुरवठा विभागाकडे कार्यरत नाहीत.तसेच अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेवर नियमीत वेतनश्रेणीवर घेण्याची मागणी केली आहे.

मा.सभापती साहेब :- या अर्जामुळे कायदेशीर काही अडचण निर्माण होवू शकते का?

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- मनपाच्या विविध विभागातील मानधनावरील कर्मचारी आस्थापनेवर नियमीत वेतनश्रेणीवर घेतलेले नाहीत. त्यांच्या मागणी नुसार वेतन दिल्यास कायदेशीर अडचणी येवू शकतात.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- किती कर्मचा-यांच्या प्रस्तावास मान्यता दयायची आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- पाणी पुरवठा विभागाने यापुर्वी पाच कर्मचारी आदेशान्वये नियुक्त केले होते.तथापी तीन कर्मचा-यांची शिफारस केली आहे.

मा.सभापती साहेब :- श्री.मनोज चंद्रशेखर शिंदे रा.नेप्तीरोड,शिवाजीनगर,कल्याणरोड,अ.नगर यांनी सभेमध्ये अर्ज देवून अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज -२ येथील विनावापरात असलेले संडास - बाथरूम ची जागा भाडेतत्वावर व्यावसायाकरीता मिळणे बाबत अर्ज केला आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- पाणी पुरवठा विभागाकडे तांत्रीक सहाय्यक या पदावर पाच कर्मचारी कार्यरत असतांना स्थायी समितीकडे प्रस्ताव देतांना तीनच कर्मचा-यांचा का देण्यात आला.पाच कर्मचा-यांपैकी तीन कर्मचा-यांचा प्रस्ताव पाठवितांना त्या कर्मचा-यांची सेवाजेष्ठता किंवा शैक्षणीक पत्रतेनुसार प्रस्ताव सादर केला आहे का?कोणते निकष लावून दोन कर्मचारी या मधून वगळण्यात आले.त्यामुळे दोन कर्मचा-यांबाबत स्पष्टता होत नाही त्यामुळे या पाचही कर्मचा-यांबाबत प्रशासनाने योग्य तो उचित निर्णय घ्यावा व अर्जदार श्री.मनोज

चंद्रशेखर शिंदे यांना अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज -२ येथील विनावापरात असलेले संडास - बाथरूम ची जागा भाडेतत्वावर व्यावसायाकरीता देण्यात यावी.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट नुसार पाणी पुरवठा विभागाती तांत्रीक सहाय्यक या पदावरील पाच कर्मचारी कार्यरत असतांना तीन कर्मचा-यांचा प्रस्ताव सादर केला असून उर्वरीत दोन कर्मचा-यांच्या नियुक्ती व आस्थापनेवर नियमीत वेतनश्रेणीवर घेण्याची मागणी केली असल्याने या बाबत बोध होत नाही तरी या बाबत निर्णय प्रशासनाने घ्यावा. श्री.मनोज चंद्रशेखर शिंदे यांना अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज -२ येथील विनावापरात असलेले संडास - बाथरूम ची जागा भाडेतत्वावर व्यावसायाकरीता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबत पाणी पुरवठा विभागाने प्रस्ताव सादर करतांना पाच कर्मचा-यांच्या ऐवजी तीन कर्मचा-यांचा प्रस्ताव सादर केला आहे.उर्वरित दोन कर्मचा-यांबाबत स्पष्टता होत नसल्याने व आस्थापनेवर नियमीत वेतनश्रेणीवर घेण्याची मागणी केली असल्याने या बाबत बोध होत नाही तरी नियुक्ती बाबत योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा. श्री.मनोज चंद्रशेखर शिंदे यांना अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज -२ येथील विनावापरात असलेले संडास - बाथरूम ची जागा भाडेतत्वावर व्यावसायाकरीता देण्यात ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबत पाणी पुरवठा विभागाने प्रस्ताव सादर करतांना ५ (पाच) कर्मचा-यांच्या ऐवजी ३ (तीन) कर्मचा-यांचा प्रस्ताव सादर केला आहे.उर्वरित २ (दोन) कर्मचा-यांबाबत स्पष्टता होत नसल्याने व आस्थापनेवर नियमीत वेतनश्रेणीवर घेण्याची मागणी केली असल्याने या बाबत बोध होत नाही तरी नियुक्ती बाबत योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार श्री.मनोज चंद्रशेखर शिंदे यांना अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज -२ येथील विनावापरात असलेले संडास - बाथरूम ची जागा भाडेतत्वावर व्यावसायाकरीता देण्यात ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. दत्तात्रय कावरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. संजय शेंडगे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०७

विषय क्रमांक- ७१ मंगळवार दि.०६/०२/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक पदी मानधनावर केलेल्या पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- १) प्रा.श्री.नारायण बाबुराव मिसाळ यांचा दि.१०/०६/२०१७ चा अर्ज २) प्रसिध्दी विभाग (स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र) जा.क्र.३१ दि.१४/०९/२०१७ ३) जा.क्र.आस्था. ३३७८ दि. १९ / १२ / २०१७ चा कार्यालयीन आदेश.

उपरोक्त विषयान्वये की, प्रा. श्री.नारायण बाबुराव मिसाळ, यांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी नेमणुक ४७७५ दि.२७/१०/२०१६ अन्वये दिनांक ३०/९/२०१६ पासुन सहा महिन्या करीता दरमहा रु.२२,०००/- एकत्रीत मुशाहि-यावर अटी व शर्ती नुसार स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्रासाठी संचालक म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करण्यात आलेली होती. दरम्यान श्री.मिसाळ यांनी दिनांक २७/२/२०१७ रोजी अर्जाद्वारे राजीनामा दिला असता त्यांना राजीनामा प्रावृत्त करणे कामी दिनांक १४/३/२०१७ रोजीच्या मंजुर प्रस्तावानुसार जा.क्र.१३३ दि.१२/४/२०१७ अन्वये राजीनामा परत घेणे बाबत सुचित करण्यात आले असता त्यांचा दिनांक १०/६/२०१७ रोजीचा अर्ज दिनांक २८/७/२०१७ रोजी इकडेस प्राप्त झालेला असुन त्यांनी सदर अर्जाद्वारे राजीनामा मागे घेवुन त्यांना ११ महिन्यासाठी पुर्ननियुक्ती देणे बाबत विनंती करुन ते दिनांक १०/६/२०१७ रोजी प्रकल्प संचालक पदी रुजु झाले बाबत इकडेस कळविलेले आहे.

प्रा.श्री.नारायण बाबुराव मिसाळ, जा.क्र.आस्था./ कंत्राटी नेमणुक दि.८/६/२०१६ अन्वये देण्यात आलेल्या नियुक्तीचा कालावधी हा दिनांक २९/३/२०१७ रोजी समाप्त झालेली असुन याच्या उपरोक्त अर्जा बाबत प्र. प्रसिध्दी अधिकारी यांचा जा.क्र.आस्था. २१३८ दि.६/९/२०१७ अन्वये प्रसिध्दी विभाग प्रमुख यांचा अभिप्राय मागविला असता प्र.प्रसिध्दी विभाग प्रमुख यांनी " प्रा. श्री. नारायण बाबुराव मिसाळ, हे दिनांक १०/६/२०१७ रोजी संचालक पदी रुजु झाले असले बाबत संदर्भिय पत्रान्वये त्यांनी मा. उपायुक्त,अहमदनगर मनपा यांना कळविले आहे. स्पर्धा परिक्षा केंद्रा कडील हजेरी मस्टर पहाता त्यांचे उपस्थिती बाबत स्वाक्षरी दि.९/६/२०१७ पासुन निदर्शनास येत आहे. व ते काम करीत आहेत. तसेच प्रा.मिसाळ,यांनी त्यांचे नियुक्ती आदेशाचे सलग ११ महिन्याची काढल्यास काम करणे सुलभ होईल असे संदर्भिय पत्रा अन्वये कळविले आहे. या बाबत प्रचलित नियमाचा विचार करुन वरिष्ठ स्तरावर निर्णय घेणे उचित होईल" "असा अभिप्राय देवुन त्यांच्या नियुक्ती बाबत शिफारस केलेली आहे.

प्रा.श्री.नारायण बाबुराव मिसाळ, हे स्पर्धा परिक्षा केंद्रांच्या प्रारंभा पासुन ( २००७ पासुन) मनपा स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक म्हणुन कार्यरत आहेत. त्यांचे काम समाधानकारक असल्यामुळे त्यांची स्पर्धा परीक्षा केंद्र संचालक म्हणुन नेमणुक करणे बाबत शिफारशी नुसार वेळोवेळी सहा सहा महिन्या करीता करारबध्द करण्यात आलेले आहे.

तरी श्री.नारायण बाबुराव मिसाळ,स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक यांची आस्था.जा.क्र.४७७५ दि. २७/१०/२०१६ अन्वये देण्यात आलेली तात्पुरती नेमणुक हि दिनांक २९/३/२०१७ रोजी समाप्त झालेली असुन प्र.प्रसिध्दी अधिकारी,यांची श्री.मिसाळ यांना पुर्ननियुक्ती देणे बाबतची शिफारस पहाता.तसेच म.न.पा.मार्फत चालविलेले स्पर्धा परिक्षा केंद्र हा एक उत्तम प्रकारचा उपक्रम असुन सदर उपक्रामात खंड पडुन येथील विद्यार्थ्याचे नुकसान लक्ष्यात घेता तसेच प्र. प्रसिध्दी अधिकारी यांचा अहवाल पहाता ते दिनांक १०/६/२०१७ पासुन कार्यरत असल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुद नुसार मनपा मार्फत संचलीत स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्रासाठी संचालक म्हणुन जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ३३७८ दिनांक १९ / १२ / २०१७ अन्वये दिनांक १०/६/२०१७ पासुन सहा महिन्या करीता दरमहा रु. २२,०००/- या एकत्रित मुशाहि-यावर केलेल्या पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर.

येणेप्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा रिपोर्ट असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक पदी मानधनावर केलेल्या पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये मयुर शिवकुमार बोचुघोळ रा.चौपाटी कारंजा,कुंभारगल्ली,नालेगांव,अ.नगर यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या सांगळे गल्ली येथील समर्थ विद्या मंदिर शाळेसमोरील व्यायामशाळा क्रां.चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट) या संस्थेस भाडेतत्वावर मिळणे बाबत अर्ज केला आहे.नियमानुसार भाडे भरण्यास आमची संस्था तयार असले बाबत अर्ज केला आहे.

मा.सौ.उषा नलवडे :- विषय पत्रीकेतील विषय क्र.७१ मधील प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक पदी मानधनावर केलेल्या पुर्ननियुक्तीस कार्योत्तर तसेच सदरची मुदत समाप्ती नंतर पुढील सहा महिन्या करीताची पुर्ननियुक्ती सुध्दा याच सभेमध्ये देण्यात यावी.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक पदी मानधनावर केलेल्या पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.तसेच सदरची मुदत समाप्ती नंतर त्यांना तांत्रीक खंड देवून पुढील सहा महिन्या करीताची पुर्ननियुक्ती सुध्दा याच सभेमध्ये देण्यात यावी.अर्जदार क्रां.चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट) या संस्थेस भाडेतत्वावर व्यायाम शाळा देण्यात यावी.

मा. सभापती साहेब :- स्पर्धा परिक्षा केंद्राच्या संचालक या पदावर श्री.नारायण बाबुराव मिसाळ, यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावरील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदरची मुदत समाप्ती नंतर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरिता पुर्ननियुक्ती करण्यास व सभे मध्ये झालेल्या चर्चे नुसार श्री.मयुर शिवकुमार बोचुघोळ यांचे अर्जानुसार क्रां.चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट) या संस्थेस सांगळे गल्ली येथील समर्थ विद्या मंदिर शाळेसमोरील व्यायामशाळा भाडेत्वार देण्यास ही सभा मान्याता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्राच्या संचालक या पदावर श्री.नारायण बाबुराव मिसाळ, यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावरील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदरची मुदत समाप्ती नंतर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरिता पुर्ननियुक्ती करण्यास व सभे मध्ये झालेल्या चर्चे नुसार श्री.मयुर शिवकुमार बोचुघोळ,रा.चौपाटी कारंजा,कुंभार गल्ली ,नालेगांव ,अ.नगर यांचे अर्जानुसार क्रां.चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट) या संस्थेस सांगळे गल्ली येथील समर्थ विद्या मंदिर शाळेसमोरील व्यायामशाळा भाडेत्वार देण्यास ही सभा मान्याता देत आहे. खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ७२ मंगळवार दि.०६/०२/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांना मानधनावर करारबध्द पुर्नयुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : १) कै.बा.दे.दवा.यांचेकडील जा.क्र. ५१९ दि.०७/०९/२०१७ चा प्रस्ताव.

२) डॉ.सौ. नंदा प्रशांत वाघ यांचा दि.१८/०९/२०१७ चा अर्ज.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांनी दि.१८/०९/२०१७ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये " कै.बा.दे.दवा. येथे वैद्यकिय अधिकारी यापदी मानधनावर कार्यरत होते. परंतु कौटूंबिक अडचणीमुळे कामावर हजर राहता आले नाही. त्यामुळे परत यापदावर पुर्ननियुक्ती मिळाली नाही, वैद्यकीय अधिकारी यापदी मानधनावर इच्छुक असल्याने पुढील पुर्ननियुक्ती मिळावी."असे नमुद करुन विनंती केलेली आहे.

तसेच संदर्भिय क्रं.१ च्या जा.क्र.कै. बा.दे. दवा.५१९दि.०७/०९/२०१७च्या प्रस्तावावर मा.वैद्यकीय आरोग्यधिकारी यांनी डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांचे दि.१४/०८/२०१७रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने "कै.बा.दे.दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी यांची कमतरता लक्षात घेऊन निर्णय घेणेस हरकत नसावी." असे सुचित केलेले आहे.

यापुर्वी कै.बा.दे.दवा.यांचेकडील जा.क्र.५८५दि.१८/१०/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रं. ९२ दिनांक १७/१२/२०१६ अन्वयेच्या पुर्व मंजुरी पारीत ठरावानुसार कै. बा.दे.दवा. करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांची जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ६१४४ दि.१०/०१/२०१७ अन्वये तांत्रिक खंड देवुन दि. २६/१०/२०१६ पासुन सहा महिन्याकरीता रु.२०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती. तथापि सदर पुर्ननियुक्तीच्या कालावधीमध्ये डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ ह्या कामावर गैरहजर होत्या. सदरच्या केलेल्या कालावधीतील पुर्नुनियुक्तीची मुदत ही दि. २६/०१/२०१७ पासुन समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अर्ज व अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै.बा.दे.दवाखान्या करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांना तंत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे झाल्यास मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणे करीता मंजुरीसाठी निर्णयास्तव सादर.

येणेप्रमाणे प्र. सहाय्यक आयुक्त यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.अ., मु.ले.प. मार्फत सादर करावे.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा स्वाक्षरी

यावर मुख्य लेखा परिक्षक याचां अभिप्राय की, महाराष्ट्र मनपा अधि. सुधारित २०११ चे कलम ५३ नुसार प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक ठरते. तसेच मा. उपायुक्त यांचे स्वंयस्पष्ट अभिप्राय घेवूनच मुलेप यांचे स्वाक्षरीसाठी सादर करण्याची यापुढे दक्षता घ्यावी. आणि आस्थापना विभाग प्रमुख यांचे अभिप्राय घेणे योग्य राहील.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सदर कर्मचारी दि.२६/१/२०१७ पासून गैरहजर आहेत त्यामुळे ६ महिने नेमणूकीचा नवीन प्रस्ताव द्यावा लागेल. महाराष्ट्र अधिनियम महानगरपालिका ॲक्टच्या संबंधित तरतुदीनुसार सादर करा.

**फेरसादर,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे - नमुद केलेले आहे.

५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेलः

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व - नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त,नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत-यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल;परंतु, कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही ." असे नमुद केलेले आहे.

तरी वरील संदर्भिय अर्ज व अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै.बा.दे.दवाखान्या करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांना तंत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर कराराबध्द पुर्ननियुक्ती बाबत मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठवावे लागेल. तथापि आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा फेरसादर असे.

यावर मा. उपायुक्त साहेब यांची स्वाक्षरी

यावर मा. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांना मानधनावर करारबध्द पुर्नयुक्ती करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा. श्री.सभापती साहेब :- डॉ.बोरगे या बाबतची माहिती सांगा.

वैद्यकीयअधिकारी डॉ.बोरगे :- मा.आयुक्तांना डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांनी अर्ज देवुन " कै.बा.दे.दवा. येथे वैद्यकिय अधिकारी यापदी मानधनावर कार्यरत होते. परंतु कौटूंबिक अडचणीमुळे कामावर हजर राहता आले नाही. त्यामुळे परत यापदावर पुर्ननियुक्ती मिळाली नाही, वैद्यकीय अधिकारी यापदी मानधनावर काम करण्यास इच्छुक असल्याने पुढील पुर्ननियुक्ती मिळणे बाबत अर्ज केला आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- किती दिवसांपासून त्या कामावार नाहीत.

वैद्यकीयअधिकारी डॉ.बोरगे :- दि.२६/१/२०१७ पासून गैरहजर आहेत.

आरोग्यधिकरी श्री. डॉ. राजूरकर :- यांची नियुक्ती कै.बा.दे. दवाखानासाठीचे केली होती.त्यांना पुर्ननियुक्ती दयावी किंवा कसे याचा विचार करावा.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- अहमदनगर महानगरपालिकेच्या इलेक्ट्रीक विभागाकडे तांत्रिक काम कामकाज पहाणे करीता सेवानिवृत्त यांची करारानुसार एकत्रित मुशाहि-यावर नियुक्तीचा प्रस्ताव आजच नगरसचिव कार्यालयाकडे पाठविला आहे.या बाबत याच सभेमध्ये निर्णय घेण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- इलेक्ट्रीक विभागा कडील सेवानिवृत्त कर्मचा-यांची नियुक्ती बाबत ची माहिती सांगा.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- विद्युत विभागाकर्डे श्री.सातपुते व श्री.सावळे यांना निलंबीत केल्यामुळे या विभागामध्ये तांत्रिक विषयी कामकाजा मध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत.या तांत्रिक अडचणी दुर करण्यात करीता येथे तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता आहे.सध्या येथे कोटेशन पध्दतीने नेमणूक केलेले सेवानिवृत्त इंजिनियर यांनी इलेक्ट्रीक विभागाकडील असलेले संपुर्ण शहरातील वीज बीलाचा व मीटरचा सर्व्हे करून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी बरोबर पत्रव्यवहार करून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल या उद्दीष्टाने व्यवस्थीत रित्या काम करत आहेत.त्यांची कोटेशन पध्दतीने नेमणूक दिनांक १५/९/१७ ते १४/१/१८ अखेर असून त्यांना सदयस्थितीमध्ये नगररचनाकार विभागामार्फत मनपाच्या मालकिच्या मिळकतीवर नोंदी लावणे व तद्दनुषंगीक कामे करणेकामी सेवानिवृत्त झालेले तहसीलदार यांची करारानुसार एकत्रित मुशाहि-यावरील नियुक्ती बाबतची कार्यवाही ही नगररचना विभागाने केलेली असुन त्याप्रमाणे इलेक्ट्रीक विभागाने विद्युत मंडहाकडील सेवानिवृत्त झालेले इंजिनीयर यांची नियुक्ती बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या अनुषंगाने मा.स्थायी समितीच्या मान्यतेनुसार करारा नुसार नियुक्ती करणे करीता हा विषय मा.नगरसचिव विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे डॉक्टर नसल्यामुळे अनेक अडचणी येतात.ही तातडीची सेवा आहे.नियमीत सेवा देण-या डॉक्टरांनाच पुर्ननियुक्ती देण्यात यावी.प्रस्तावीत डॉक्टर जर नियमीत सेवा देत नसतील व त्यांनी कामकरण्यात असमर्थ असतील तर त्यांना पुर्ननियुक्ती देण्यात येवू नये.व विद्युत विभागाकरीता तांत्रिक कामाकरीता इंजिनीयरआवश्यकता व विद्युत विभागा मध्ये कामाची निकड पहाता सध्या या विभागामध्ये कोटेशन पध्दतीने नियुक्त केलेले एम.एस.ई.बी. मधून सेवानिवृत्त झालेले इंजिनीयर श्री.शिवप्रकाशन भार्गवन व श्री विजय शंकर तिवारी यांना सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरूपात करारानुसार नियुक्ती करण्यात यावी.

मा.श्री.संजय शेंडगे :- प्रस्तावित डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ या दिनांक २६/१/२०१७ पासुन कामावर नसल्याने त्यांची पुर्ननुयुक्तीचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.व विद्युत विभागातील श्री.सातपुते व श्री.सावळे हे निलंबीत

झाल्याने या विभागाकरीता तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता आहे. सध्या या विभागामध्ये कोटेशन पध्दतीने नियुक्त केलेले एम.एस.ई.बी. मधून सेवानिवृत्त इंजिनीयर यांचे काम चांगल्या पध्दतीचे असल्या ने त्यांना या विभामध्ये कामाची निकड पहाता त्यांना करारानुसार ६ महिन्या करिता नियुक्ती देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांना मानधनावर करारबध्द पुर्नयुक्ती करणे बाबत सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार प्रस्तावित केलेली पुर्ननियुक्ती रद्द करण्यात येत आहे.व विद्युत विभागातील श्री.सातपुते, इंजिनीयर व श्री.सावळे ,इले.सुपरवाझार हे निलंबीत झाले आहेत.त्यामुळे या विभागाकरीता तांत्रिक कर्मचा-यां अभावी कामामध्ये विस्कळीत पण येण्याची शक्यता लक्षात घेवून सध्या या विभागामध्ये कोटेशन पध्दतीने नियुक्त केलेले एम.एस.ई.बी. मधून सेवानिवृत्त इंजिनीयर यांनी वीज बील व मीटर यांचा सर्व्हे करून महानगरपालिकेच्या आर्थीक हिताचे काम चांगल्या पध्दतीने केले असल्याने तसेच या विभागमध्ये कामाची निकड पहाता त्यांना ६ महिन्या करिता करारा नुसार नियुक्ती देण्यात यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे डॉ.सौ.नंदा प्रशांत वाघ यांना मानधनावर करारबध्द पुर्नयुक्ती करणे बाबत सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार प्रस्तावित केलेली पुर्ननियुक्ती रद्द करण्यास तसेच विद्युत विभागाकरीता तांत्रिक कामाकरीता इंजिनीयरआवश्यकता व विद्युत विभागा मध्ये कामाची निकड पहाता सध्या या विभागामध्ये कोटेशन पध्दतीने नियुक्त केलेले एम.एस.ई.बी. मधून सेवानिवृत्त झालेले इंजिनीयर श्री.शिवप्रकाशन भार्गवन व श्री विजय शंकर तिवारी यांना अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील तांत्रिक कामकाज पहाणे करीता एकत्रित मुशाहि-यावर दिनांक १७/१/२०१८ पासून सहा महिन्या करीता करारानुसार नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.नियुक्ती बाबतची पुढील सर्व कार्यवाही विद्युत विभागाने पुर्ण करावी.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.बाबासाहेब वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ७३ मंगळवार दि.०६/०२/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये पॅनल शिपवरील भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन वाढी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना व सुतिकहा गृह विभाग

संदर्भ- १. जा.क्र.आस्थापना १६२७ दि.२९/७/२०१७ ने पॅनल नेमणूक

२. मा.स्थायी समिती सभा क्र.१ ठराव क्र.१४ दिनांक ८/४/२०१३ ने मानधन वाढ

३. पॅनलवरील डॉक्टराचा प्रति केस मानधन वाढीबाबतचा अर्ज

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कै.बा. दे. दवाखान्यामार्फत विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, दवाखान्याकरिता सिझेरीयन शस्त्रक्रिया , एम.टी.पी. शस्त्रक्रिया, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया इ. करिता भुलतज्ञांची आवश्यकता भासते. त्याकरिता जा.क्र.आस्थापना १६२७ दि.२९/०७/२०१७ अन्वये खाजगी भुलतज्ञ ांची तात्पुरत्या स्वरूपात दि.१०/७/२०१७ ते ९/७/२०१८ अखेर एक वर्षाकरिता नेमणूक करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे मायनर ऑपरेशन करिता रू.५००/-, मेजर ऑपरेशन करिता रू.१०००/- व नाईट अॅण्ड हायरीस्क केसेस करिता रू.१५००/- मानधन मान्य करण्यात आलेले आहे. दवाखान्यामधील आवश्यकतेनुसार पॅनल मधील भुलतज्ञांना कॉल केल्यानंतर भुलतज्ञ दवाखान्यामध्ये येउन रूग्णाला भुल देण्याचे काम करतात. वरील भुलतज्ञांचा पॅनल दवाखान्यामध्ये साधारण २५ वर्षापासून अत्यल्प दरांमध्ये भुल देणे संदर्भात अत्यल्प दरात सेवा पुरवित आहेत. दरम्यानाच्या कालावधीमध्ये अकौंट विभागाकडून मानधन देण्यामध्ये अनियमितता व टी.डी.एस.ची रक्कम खात्यावर जमा न केलेमुळे भुलतज्ञ डॉक्टरांनी दि.०१/१०/२०१७ पासुन काम करणे बंद केलेले आहे. त्यामुळे भुलतज्ञ डॉक्टरां अभावी दवाखान्यामधील तातडीच्या शस्त्रक्रिया बंद पडलेल्या आहेत व रूग्णांना जिल्हा सामान्य रूग्णालयामध्ये संदर्भित करावे लागत आहे. यापुर्वी भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन वाढ ही वरील संदर्भ क्र.२ ने चार वर्षापुर्वी सन २०१३ मध्ये करण्यात आलेली आहे.

भुलतज्ञ डॉक्टरांच्या मागणीबाबत मा.आयुक्तसाहेब यांच्या दालनामध्ये भुलतज्ञ डॉक्टर्स व मा.आयुक्त यांची चर्चा होवुन भुलतज्ञ डॉक्टरांनी मानधन वेळेवर मिळणे,टी.डी.एस.ची रक्कम खात्यावर वेळेत जमा करणे तसेच यापुर्वीची मानधन वाढ ही मागील ४वर्षापुर्वी केली असल्याने सध्याच्या महागाईचा विचार करता मानधन वाढ करणेबाबत या कार्यालयास पत्र दिलेले आहे व तनंतरच काम सुरू केले जाईल असे नमुद केले आहे.

तद्नंतर डॉ.श्री. सतीष राजुरकर हे प्र. वैद्यकीय अधिक्षक म्हणून दिनांक ०२/११/२०१७रोजी हजर झालेनंतर भुलतज्ञ डॉक्टरांशी त्यांचेस्तरावर वारंवार बैठका घेउन भुलतज्ञ डॉक्टरांशी चर्चा करून भुलता डॉक्टर यांनी दवाखान्याच्या तातडीच्या शस्त्रक्रियांच्या कामाची गैरसोय लक्षता घेता त्यांच्या मागण्यापुढे ठेवुन पुढील दोन महिन्याकरिता जुन्या दराने काम करणेस तयार झालेले आहेत व त्या अनुषंगाने भुलतज्ञ डॉक्टरांनी या कार्यालयास रूजू अहवाल सादर केलेले आहेत.

तथापि भुलतज्ञ डॉक्टरांच्या थकीत मानधन देयके व मागील दोन वर्षाच्या टी.डी.एस. च्या रक्कमा त्यांच्या आयकर खात्यामध्ये जमा करणेकामी लेखा विभागाकडून तात्काळ कार्यवाही होणे गरजेचे आहे.

तसेच भुलतज्ञ डॉक्टरांनी मागणी केलेल्या मानधन वाढीबाबत प्रस्तावीत तक्त्या खालील प्रमाणे-

| अ क्र. | पॅनलशीपवरील तातपुरत्या स्वरूपात पदनाम | सध्याचे देण्यात येणारे मानधन दर | भुलतज्ञांच्या पॅनलने मागणी केलेले मानधन | या कार्यालयाने प्रस्तावीत केलेले भुलतज्ञांना द्यावयाचे मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | भुलतज्ञ | १. मायनर ऑपरेशन करिता रू.५००/-<br>२. मेजर ऑपरेशन करिता रू.१०००/-<br>३. नाईट / हायरिक्स करिता रू.१५००/- | १.M.T.P/O.S.tightening R.s.८००/- per case<br>२. M.T.P. with T.L. R.s. १२००/- per case<br>३.L.S.C.S. R.s.१५००/- per case<br>४. Night L.S.C.S. R.s.२०००/- Per case<br>५.High Risk L.S.C.S. R.s. २०००/- Per case | १. मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया(G.A.) करिता रू.६००/- प्रति केस<br>२. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.८००/-<br>३. सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.१५००/- प्रति केस<br>४.नाईट सिझेरीयन व हायरीस्क करिता रू.१७००/- प्रति केस (Night १०:०० pm to ६:०० am ) |

वरील तक्त्यात या कार्यालयामार्फत प्रस्तावीत केल्याप्रमाणे मायनर ऑपरेशन पुढील प्रमाणेः- (D & E, M.T.P., M.T.P., With T.L. , Episiotomy resuturing, wound resuturing ,Tubectomy, Secondary suturinh after delivery, abscess drainage), मेजर ऑपरेशन पुढीलप्रमाणे- (L.S.C.S., Laparotomy,) हायरिस्क ऑपरेशन पुढील प्रमाणे- (severe P.I.H. , Previous two L.S.C.S., severe Anaemea, D.M., any medical problem of patient ) व नाई म्हणजे- (१०:०० pm to ६:०० am मध्ये होणा-या शस्त्रक्रिया) या बाबींचा समावेश आहे. सध्या खाजगी दवाखान्यांमध्ये भुलीचे दर पाहता वरील दर हे अत्यंत कमी व वाजवी आहेत.

तरी कै.बा. दे. दवाखान्याची भुलतज्ञ डॉक्टरां अभावी गैरसोय होउ नये म्हणून १. मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करीता रु. ६००/- प्रतिकेस २) मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रु. ८००/- ३) सिझेरीयन शस्त्रक्रिया करीता रु. १५००/- प्रतिकेस ४) नाईट रिझेरीयन व हायरिस्क करिता रु. १७००/- प्रतिकेस (Night १०:०० pm to ६:०० am) याप्रमाणे संदर्भ क्र.१ नुसार सध्या नेमण्यात आलेल्या भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलला मानधन वाढ देणे उचित वाटते. सदरचे वाढीव दर हे किमान दोन वर्षाकरिता लागु असतील तरी भुलतज्ञ डॉक्टरांच्या मानधन वाढी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवणेस मान्यतेस्तव व भुलतज्ञ डॉक्टरांच्या थकीत मानधन व टी.डी.एस. च्या रकमा आयकर खात्यावर जमा करणेस लेखा विभागास आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र.वैद्यकीय अधिक्षक यांचा रिपोर्ट असे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेप्रमाणे आस्थापना विभागाचे अभिप्राय घेउन मा. स्थायी समितीच्या मंजुरीस अधिन राहून विभागाने उचित कार्यवाही करावी.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, आस्थापना श्री. काकडे प्रस्ताव सादर करा.

संदर्भ : १) जा.क्र.आस्था.१६२७ दि.२९/०७/२०१७ अन्वयेचा कार्यालयीन आदेश.
२) जा.क्र.कै.बा.दे.दवा. ८६० दि.१६/१२/२०१७ चा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये की, जा.क्र.कै.बा.दे.दवा. ८६० दि.१६/१२/२०१७ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना मधील पॅनलशिपवरील भुलतज्ञ डॉक्टारांचे मानधनवाढी बाबत नमुद केलेले आहे.

कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये जा.क्र.आस्था. १६२७ दि.२९/०७/२०१७ अन्वये डॉ. सौ. सायंबर व १२ यांची तात्पुरत्या स्वरुपात भुलतज्ञ डॉक्टर म्हणुन दि. १०/०७/२०१७ ते ०९/०७/२०१८ अखेर पॅनलशिपवर एक वर्षाच्या कालावधी करिता प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रु.५००/-,मेजर ऑपरेशन करीता रु.१०००/-,नाईट ॲण्ड हायरिस्क केसेस करिता रु. १५००/- यावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचे संदर्भिय जा.क्र.कै.बा.दे. ८६० दि. १६/१२/२०१७ च्या प्रस्तावामध्ये १. मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करीता रु. ६००/- प्रतिकेस २) मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रु. ८००/- ३) सिझेरीयन शस्त्रक्रिया करीता रु. १५००/- प्रतिकेस ४) नाईट रिझेरीयन व हायरिस्क करिता रु. १७००/- प्रतिकेस (Night १०:०० pm to ६:०० am) याप्रमाणे संबधित पॅनलशिपवरील भुलतज्ञ डॉक्टर यांचे मानधन वाढी संदर्भात नमुद केलेले आहे.

तरी संदर्भिय कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना जा.क्र. ८६० दि.१६/१२/२०१७ अन्वयेच्या प्रस्तावानुसार तात्पुरत्या स्वरुपात पॅनलशिवरील भुलतज्ञ डॉक्टारांचे मानधनवाढी संदर्भातील विषय आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव कै.बाळासाहेब देशपांडे रुग्णालय यांचे मार्फत मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणे उचित वाटते.,

येणेप्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा फेरसादर असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, भुलतज्ञांचे मानधनाबाबत रिपोर्ट मा. सथायी समिति कडे पाठवले बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा. आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :-अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये पॅनल शिपवरील भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन वाढी बाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना १. मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करीता रु. ६००/- प्रतिकेस २) मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रु. ८००/- ३) सिझेरीयन शस्त्रक्रिया करीता रु. १५००/- प्रतिकेस ४) नाईट रिझेरीयन व हायरिस्क करिता रु. १७००/- प्रतिकेस (Night १०:०० pm to ६:०० am) याप्रमाणे संबधित पॅनलशिपवरील भुलतज्ञ डॉक्टर यांचे मानधना मध्ये वाढ करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील पॅनलशिपवरील भुलतज्ञ डॉक्टर यांचे मानधनामध्ये १. मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करीता रु. ६००/- प्रतिकेस २) मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रु. ८००/- ३) सिझेरीयन शस्त्रक्रिया करीता रु. १५००/- प्रतिकेस ४) नाईट रिझेरीयन व हायरिस्क करिता रु. १७००/- प्रतिकेस (Night १०:०० pm to ६:०० am) याप्रमाणे वाढ करण्यास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिति<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ७४ मंगळवार दि.०६/०२/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागअत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ.स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** पाणीपुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा योजना ११०० दि.४/१/२०१८ चा प्रस्ताव

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. शहर पाणीपुरवठा योजना ११०० दि.०४/०१/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये पाणीपुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ. स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीची कालावधी दि.१६/०८/२०१७ ते १५/०२/२०१८ अखेर असुन सदरची मुदत ही दि.१५/०२/२०१८ रोजी समाप्त होत असल्याने त्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.

सौ. स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांची सद्यस्थितीमध्ये जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक २७४७ दि.०२/११/२०१७ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी रू.२००००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.१६/२/२०१७ पासून सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि.१५/०२/२०१८ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ. स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांना तांत्रिक खंड देवुन दि. १९/०२/२०१८ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये २००००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मु.ले.अ. , मु.ले.प.मार्फत फेरसादर करावे.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा स्वाक्षरी

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, "अ" नुसार कार्यवाही करणेस हरकत नसावी. मा. उपायुक्त यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेवूनच मुलेप यांचे स्वाक्षरीसाठी सादर करण्याची यापुढे दक्षता घ्यावी. तसेच आस्थापना प्रमुख यांचे अभिप्राय घेणे योग्य राहील. मागील सेवा कोणत्याही प्रयोजना ग्राहय धरण्यांत

येणार नाही या अधीन राहून विभागाने उचित निर्णय घ्यावा. वरील प्रस्तावाबाबत अधिनियमातील कलम ५३ (३) प्रमाणे विभागाने उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा स्वाक्षरी

यावर मा. आयुक्त साहेब यांचा स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागअत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ.स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- कनिष्ठ अभियंता सौ.स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांनी सभेमध्ये अर्ज देवून त्यांना सध्या मिळणारे प्रतिमहा मानधन रू.२०,०००/- असून त्यांनी रककम रू.३०,०००/- करणे बाबत मागणी केली आहे.

मा.सौ.उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सौ.स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे या अभियंत्यांचे मानधन रक्कम रूपये २०,०००/- असून त्यामूधन टी.डी.एस.व ई.पी.एफ.यांचे जवळपास २२ टक्के कपात होते.सदर अभियंत्यांचे काम चांगले असून त्यांना स्थळ पहाणी करणे कामी कार्यालया बाहेर जावे लागते या करीता त्यांना वेगळा प्रवास भत्ता देण्यात येत नाही.ते त्यांचे स्वतःचे वाहन व इंधन या करीता वापरतात.त्यामुळे या अभियंत्यांचे मानधन रक्कम रू.२०,०००/- असून त्यामध्ये रक्कम रू.५,०००/- ने वाढ करून त्यांचे मानधन रू.२५,०००/- करण्यात यावे.

मा.श्री.संजय शेंडगे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सौ.स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांचे मानधनामध्ये रू.५०००/- वाढ करण्यात यावी.

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागअत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ.स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.सभेमध्ये प्राप्त अर्ज व झालेल्या चर्चे नुसार सौ.स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे या अभियंत्यांचे काम चांगले असून त्यांना रोज स्थळ पहाणी करणे कामी बाहेर जावे लागते या करीता त्यांना वेगळा प्रवास भत्ता देण्यात येत नाही.ते त्यांचे स्वतःचे वाहन व इंधन या करीता वापरतात तसेच टी.डी.एस.व ई.पी.एफ.यांचा विचार करता सदरच्या अभियंत्यांचे मानधनामध्ये रक्कम रू.५,०००/- ने वाढ करून त्यांचे मानधन रू.२५,०००/- करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागअत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ.स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास ही सभो मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. सौ.स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. विशाल गोरख शिंदे या अभियंत्यांचे काम चांगले असून त्यांना रोज स्थळ पहाणी करणे कामी बाहेर जावे लागते या करीता त्यांना वेगळा प्रवास भत्ता देण्यात येत नाही.ते त्यांचे स्वतःचे वाहन व इंधन या करीता वापरतात तसेच टी.डी.एस.व ई.पी.एफ.यांचा विचार करता सदरच्या अभियंत्यांचे मानधनामध्ये रक्कम रू.५,०००/- ने वाढ करून त्यांचे मानधन रू.२५,०००/- करण्यास ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार प्रढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ७५ मंगळवार दि.०६/०२/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मूल्यांचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभाग

संदर्भ- संचालक , महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ७०४ /अस दि.२३ सप्टेंबर २००९

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करणेत येतो की, आज मितीस महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अग्निशमन दलामार्फत आपत्कालीन प्रसंगी सेवा पुरविली जाते. परंतू इतर महानगरपालिकाप्रमाणे कोणत्याही प्रकारचे शुल्क / अग्निशमन कर आकारणी केली जात नाही.

संदर्भिय शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ दि.६ डिसेंबर २००८ पासुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात लागू केला आहे. या अधिनियमाचे कलम ४ अन्वये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ शासनाने दि.२३ जून २००९ रोजी मंजूर करून शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहेत.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ लागू करण्यात आलेले असून दि.२२ जून २०१० रोजीच्या मनपाच्या सर्वसाधारण सभेच्या प्रस्ताव क्र.९ अन्वये सदर अधिनियम व नियमांची अंमलबजावणी व कार्यवाही होणे करिता सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्याने अधिनियम व नियमांन्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी उपरोक्त अधिनियम २००६ चे कलम २५(३) नुसार अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी व काही प्रमाणात अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च भागविणेसाठी शासन निर्णयानुसार नगरविकास विभाग क्र.अशस १४०७/३०६/प्र.क्र.२११ /नवि-२० दि.३१/८/२००९ नुसार अग्निशमन सेवेतील तूट भरून काढणेसाठी अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतुदीनुसार 'आग सुरक्षा निधी' त्याचबरोबर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९ चे (क) च्या ६३ नुसार 'अग्निशमन कर' आकारणे बंधनकारक आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे ज्या अग्निशमन सेवा अशा प्रकारचा कर अकारत नाहीत त्यांनी तो तात्काळ चालू करणे आवश्यक आहे. असे संदर्भिय शासकीय परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले असल्याने अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्यांचे २% अग्निशमन कर सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षापासून लागू करण्यास आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी यांचा रिपोर्ट असे.

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मु.ले.अ., मु.ले.प. मार्फत सादर करावे.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, शासकीय परिपत्रकान्वये निर्देशनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणे बाबत उचित निर्णयास्तव ,महाराष्ट्र शासन यांचे पत्र दि.२३/९/२००९ मधील परि. क्र.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे विभागाने अभिप्रायासह फेरसादर.

फेरसादर,

मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन यांचे दि.२३/९/२००९ चे पत्रान्वये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम २५(१) नुसार आग सुरक्षा (Fire Protection Fund) निर्माण करणे सर्व नागरिक स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणांना बंधनकारक असल्याने अहमदनगर महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये सन २०१०-११ पासून "आग सुरक्षा निधी" या नावाने संबांधला जाणारा स्वतंत्र लेखशिर्ष स्थापन करण्यात आलेले आहे.

सदर लेखाशिर्षाखाली जमा होणारा निधी स्वंतत्र लेखाशिर्ष उघडून सदर लेखाशिर्षामध्ये सदरचा निधी जमा करणेबाबत अशाद जा.क्र.४६४ दि.१६/०३/२०१२ अन्वये मा.आयुक्त साहेब यांचे प्रशासकीय मान्यतेने लेखा विभागास कळविणेत आलेले होते. मात्र त्यावर कार्यवाही न झाल्याने पुन्हा अशाद जा.क्र.४५६ दि.२७/०१/२०१६ अन्वये मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी देखील सदर स्वतंत्र खाते उघडणेबाबत अभिप्राय नोंदवून त्याबाबत उचित कार्यवाही करणेस निर्देश दिलेले होते. त्या अन्वये लेखा विभागाकडेस सादर करण्यात आलेले होते. तसेच नुकत्याच दि.०३/०१/२०१८ रोजी झालेल्या मा. सर्वसाधारण सभेत अग्निशमन विभागाशी संबंधित विषयांबाबत साधकबाधक चर्चा होवून मा. आयुक्त साहेब यांनी सदरचे नवीन लेखाशिर्ष उघडणेबाबत मा. मुख्य लेखाधिकारी यांना आदेश / निर्देश दिलेले आहेत.

येणेप्रमाणे महाराष्ट्र शासन यांचे पत्र दि.२३/०९/२००९ मधील परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे खुलासा / अभिप्रायासह सादर.

सोबत- संदर्भिय पत्रे जोडली आहेत.

येणेप्रमाणे अग्निशमन विभाग प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, फेरसादर विभागाने "ब" प्रमाणे खुलासा केल्यानुसार बाबत उचित निर्णयास्तव ,मागील प्रस्तावातील "अ" प्रमाणे लागु करण्याबाबत मा.स्थायी समिती / मा. महासभा मान्यतेस्तव सादर करणे योग्य राहील.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, यथाप्रस्तावीत मान्य

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मूल्यांचे २% अग्निशमन कर लागू करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभाग प्रमुख या प्रस्तावाबाबतची माहिती सांगा.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- मा. शासनाचे संचालक , महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ७०४ /अस दि.२३ सप्टेंबर २००९ अन्वयेचे परिपत्रकानुसार सन २०१०-२०११ पासुन महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्यांचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबत सुचविल केले आहे व तेव्हापासूनचा प्रस्ताव मा.सभे पुढे ठेवण्यात येतो.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- अग्निशम पथक नेमण्याची जबाबदारी कोणाची आहे.व कोणत्या नियमानुसार आहे

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ६३ (५) अन्वये अग्निशम पथक नेमण्याची जबाबदारी मा.आयुक्त साहेब यांची आहे.

मा.श्री. संजय शेंडगे :- सरकारने केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार किती लोकसंख्येमागे अग्निशमन वाहनाची आवश्यकता आहे.व किती चौ.की.मी.क्षेत्राकरीता अग्निशमन केंद्राची गरज आहे.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- मार्गदर्शक तत्वानुसार ५० हजार ते ३ लाख लोकसंख्येकरिता १ फायर स्टेशन आवश्यक आहे व त्यापुढील १ लाख लोकसंख्येकरिता फायरस्टेशन आवश्यक आहे. तसेच १० चौ.की.मी. क्षेत्राकरिता १ फायर स्टेशन आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- कायदया नुसार मनपा अग्निशमन विभाग कार्यवाही करते का , शहराची वाढती लोकसंख्या व उंच इमारती ज्यामध्ये नुकतेच न्यायालयीन इमारतीचे बांधकाम झाले असून त्याची उंची २४ मीटर पेक्षा जास्त असल्याने जर एखादी दुर्घटना झाल्यास तर अग्निशमन विभागाकडेस तशी उपाययोजना उपलब्ध आहे काय ?

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- अग्निशमन विभाग महानगरपालिका कायदयानुसार कामकाज करते पंरतू वाहनाची कमतरता, साहित्य कमी व अप्रशिक्षत कर्मचारी यामुळे कामांमध्ये अडचणी येत आहेत. आपण म्हटल्याप्रमाणे २४ मीटर पेक्षा जास्त उंचीचा इमारतीस काही दुर्घटना झाल्यास आपणाकडे तशी व्यवस्था नाही. अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी व काही प्रमाणात अधिकारी कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च भागविणेसाठी २% अग्निशमन कर लागू करण्यात यावा.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- आताच घरगुती वापर नळ कनेक्शन करिता रू. १०००/- वाढ केला आहे. त्यामुळे या करात वाढ करू नये.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्यांचे २% अग्निशमन कर लागू करण्यात यावा.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्यांचे अर्धा टक्का अग्निशमन कर लागू करण्यात यावा.

मा.श्री. संजय शेंडगे :- प्रत्येक करयोग्य मुल्यांवर १ टक्के अग्निशमन कर लागू करणेस मंजुरी देण्यांस शिफारस करण्यांत यावी.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्यांचे १% अग्निशमन कर लागू करण्यात यावा. अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहराच्या सुरक्षीततेचा विचार करता अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी व काही प्रमाणात अधिकारी कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च भागविणेसाठी प्रत्येक करयोग्य मूल्यांचे १% अग्निशमन कर लागू करणेस ही सभा मान्यता देत आहे.अग्निशमन करामध्ये जमा होणारी रक्कमेकरीता स्वतंत्र्य खाते निर्माण करून या पैशाचा विनीयोग हा अग्निशमन विभागाच्या सक्षमीकरणाकरीता करण्यात यावा.प्रस्ताव अखेर मंजूरीसाठी मा.महासभेकडेस सादर करण्यांत येत आहे.

**ठराव :-** मा. शासनाचे संचालक , महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ७०४ /अस दि.२३ सप्टेंबर २००९ अन्वयेचे परिपत्रकानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९ (क) अन्वये अहमदनगर महानगरपालिका सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मूल्यांचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबत सभेत झालेल्या साधक-बाधक चर्चेनुसार अहमदनगर शहराच्या सुरक्षीततेचा विचार करता अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी व काही प्रमाणात अधिकारी कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च भागविणेसाठी तसेच अग्निशन सेवेतील तूट भरून काढणेसाठी प्रत्येक करयोग्य मूल्यांचे १ (एक)% अग्निशमन कर लागू करणेस ही सभा मान्यता देत आहे.अग्निशमन करामध्ये जमा होणारी रक्कमेकरीता स्वतंत्र्य खाते निर्माण करून या पैशाचा विनीयोग हा अग्निशमन विभागाच्या सक्षमीकरणाकरीता करण्याची शिफारस करण्यांत येत आहे. प्रस्तावास अखेर मंजूरी साठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक :- मा.श्री. संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका